# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १२.०९.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. ६ विशेष पथकाची कामगीरी :– अवैध देशी–विदेशी दारूविक्री करणाऱ्या आरोपींविरूध्द कारवाई.**

**अ)** दिनांक ११.०९.२०२६ रोजी, मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६ चे विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, सुनिल बियरबार चे बाजुला असलेल्या वेट अॅन्ड वॉच चायनीज सेंटर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी तनिष्क आतिष रहाटे, वय १९ वर्षे, रा. हरीदास नगर, कामठी हा आपले ताब्यात देशी दारू सह्याद्री गोल्ड नावाच्या १८० मि.ली. च्या २४ नग बॉटल, मास्टर डिलाइट १८० मि.ली. च्या ४ नग बॉटल तसेच, विदेशी दारु रॉयल चॅलेंज १८० मिलीच्या ०४ बॉटल्स, मॅक्डोल १८० मिलीच्या ०५ बॉटल्स, स्टरलिंग बी–७ १८० मिलीच्या ०५ बॉटल्स, आयकॉनिक व्हाईट १८० मिलीच्या ०४ बॉटल्स, मॅक्डॉल नंबर १ च्या १८० मिलीच्या ०९ बॉटल्स, रॉयल स्टॅग १८० मिलीच्या ०८ बॉटल्स, ऑफीसर्स चॉईस १८० मिलीच्या ०२ बॉटल्स, ग्रॅन्ड मास्टर १८० मिलीच्या ०४ बॉटल्स, इंपीरीयल ब्ल्यु १८० मिलीच्या २० बॉटल्स, मॅजिक मोमेंटस १८० मिलीच्या ०८ बॉटल्स असा अवैद्यरित्या दारूसाठा बाळगुन, विक्री करतांना मिळुन आला. आरोपीस परवाना बाबत विचारणा केली असता, त्याने कोणताही परवाना नसुन, अवैधरित्या विक्री करीत असल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन देशी, विदेशी दारू किंमती एकुण २१,२६५/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा अवैद्यरित्या दारूसाठा बाळगुन विक्री करतांना समक्ष मिळुन आल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे जुनी कामठी येथे कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपीस मुद्देमालासह जुनी कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**ब)** पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, चौधरी हॉस्पिटल समोरील बाळा टेलरचे घराचे बाजुला, चंद्रमणीनगर येथे राहणारी महिला आरोपी नामे वंदना चंद्रशेखर बन्सोड, वय ४० वर्षे हिचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी ही ग्राहक १) शितल उर्फ विक्की नामदेव मेश्राम ३) सिदधार्थ विश्वनाथ पाटील यांना दारु पिण्यास जागा उपलब्ध करुन देऊन, दारुविक्री करतांना समक्ष मिळून आली. आरोपीचे घराची पाहणी केली असता, तेथे देशी दारू भिंगरी संत्रा नंबर १ च्या ९० मि.ली. च्या ८० नग बॉटल तसेच, १८० मि. ली. च्या ४ नग बॉटल असा अवैध देशी दारू मिळून आली. आरोपीस परवानाबाबत विचारणा केली असता, तिने कोणताही परवाना नसुन, अवैधरित्या दारुविक्री करुन पिण्यासाठी जागा उपलब्ध करुन देत असल्याचे कबुल केले. आरोपीचे ताब्यातुन देशी दारू व काचेचे ग्लास असा किमती एकुण ३,४२०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी ही अवैद्यरित्या दारूसाठा बाळगुन, विक्री करून व ग्राहकांना दारु पिण्याकरीता जागा उपलब्ध करुन देतांना समक्ष मिळुन आल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे नवीन कामठी येथे कलम ६५(ई),६८ महा. दारूबंदी

कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपीस मुद्देमालासह नवीन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर विभाग) नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६) यांचे देखरेखीखाली, पोलीस उपआयुक्त परि. क्र. ६ विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>२) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या ईसमाविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ११.०९.२०२६ चे २१.५० ते २२.३० वा. चे सुमारास, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत अली मंच समोरील रुईगंज मैदानाजवळील शहबाज शेख याचे पानठेल्यामध्ये प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ विक्री होत आहेत. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी त्यांनी जुनी कामठी पोलीसांसह रेड कारवाई केली असता, तेथे पानठेला उघडा दिसुन आला व त्यामध्ये एक इसम हजर मिळून आला. त्यास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव शहबाज शेख अब्दुल अजीज, वय ३४ वर्षे, रा. गुजरी बाजार, आसिफ हॉटेलचे मागे, कामठी, नागपुर असे सांगुन, तो पानठेला मालक असल्याचे सांगितले. पंचासमक्ष त्याचे पानठेल्याची पाहणी केली असता, तेथे रजनीगंधा, डायरेक्टर, विमल, मुसाफीर, पानपराग, पिके, प्रिमीयम, राजश्री, व्हीवन, टोबॅको, व्हीवन किंग या कंपन्यांचा पानमसाला तसेच, हुक्का पॉट, हुक्का नळ्या, वेगवेगळ्या फ्लेवरचे तंबाखुजन्य हुक्का असा मुद्येमाल मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन रोख २,६००/—रू. व वेगवेगळ्या कंपनीचे तंबाखुजन्य पदार्थ असा एकुण २५,७१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीररित्या विक्री करीता बाळगुन त्याची विक्री करतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरुध्द कलम २२३,२७४,२७५ भा.न्या.सं. सहकलम ३३ म.पो.का., सहकलम २६(२)(iv),३०(२)(a),५९(i) अन्न सुरक्षा मानके अधिनीयम—२००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस मुद्येमालासह जुनी कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे मार्गदर्शनात, सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. अक्षय सावंत, पोहवा. मधुकर निखाडे, अनुप लोलुसरे, पोअं. अर्शद शेख, साहील भोयर, नितीन नारे, विष्णु खाटके, पोअं. योगेश पिपरोदे व गोपाल टिके यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे यशोधरानगर :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी कु. श्रेया रविशंकर पाली, वय २१ वर्षे, रा. पाहुणे ले—आऊट, प्लॉट नं. ९७, पिवळी नदी, कामठी रोड, यशोधरानगर, नागपूर यांचे वडीलांचा देहांत सन २०१९ मध्ये झालेपासुन, त्यांचे आजोबा आरोपी नामे नत्थुलाल भगवतीप्रसाद पाली, वय ७० वर्षे यांचे सतत हात—पाय दुखुन, त्यांची प्रकृती चांगली राहत नव्हती. याकरीता ते फिर्यादीचे आई श्रीमती लक्ष्मीबाई रविशंकर पाली, वय ४२ वर्षे ह्याच काहीतरी बरे—वाईट करतात असा संशय घेवुन, त्यांचेशी नेहमी झगडा—भांडण करायचे. दिनांक १२.०९.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास त्याच कारणाने त्यांनी फिर्यादीचे आईसोबत झगडा—भांडण केले. या गोष्टीचा राग मनात धरून, १२.३० वा. ते १३.०० वा. चे दरम्यान, आरोपीने आपले राहते घराचे किचनरूमचे दरवाज्याजवळ, फिर्यादीचे आईचे डोक्यावर लोखंडी कुऱ्हाडीने वार करून, गंभीर जखमी करून, स्वतः सुध्दा राहते घराचे मागील परीसरातील विहीरीचे पाण्यात उडी घेतली. नातेवाईक तथा फायरब्रिगेड चे मदतीने आरोपीस विहीरीचे पाण्याबाहेर काढण्यात आले. पोलीसांनी व नातेवाईकांनी फिर्यादीची आई गंभीर जखमी व आरोपी या दोघांनाही उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीची आई यांना तपासुन मृत घोषित केले. आरोपी नत्थुलाल भगवतीप्रसाद पाली याचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि. शशीकांत नागरगोजे ८४५९६९७३७० यांनी आरोपीविरुध्द कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ११.०९.२०२६ चे १८.२५ वा. चे सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोंलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, बेलतरोडी रोडवरील नाल्याचे बाजुला असलेल्या ए—वन पानठेल्याचे बिल्डींगमधील पार्कीगमध्ये काही इसम जुगार खेळत आहेत. अशा माहितीवरुन घटनास्थळी रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) हेमंत रमेश भोसले, वय ३० वर्षे, रा. बच्चुसिंग ले—आऊट, अय्यप्पा मंदीरजवळ, नरेंद्रनगर, २) प्रविण दिलीप जाधव, वय ३२ वर्षे, रा. कल्पवृक्ष अपार्टमेंट, डि—मार्टचे बाजुला, बेलतरोडी, ३) अमोल उर्फ सचिन साहेबराव जाधव, वय ३० वर्षे, रा. रेवतीनगर, ईरा इंटरनॅशनल स्कुलजवळ, नागपुर ४) रोशन रामप्रसाद प्रजापती, वय २२ वर्षे, रा. मॉ भगवती नगर, हुडकेश्वर, ५) आकाश रामराव होले, वय ३४ वर्षे, रा. पार्वतीनगर, जीवन शाळेजवळ, रामेश्वरी, ६) नितीन अनिल काकडे, वय ३२ वर्षे, रा. डोबी कॉलनी, नरेंद्रनगर, ७) प्रतिक नेताजी शिंगाडे, वय २८ वर्षे, रा. राकेश ले—आऊट, बेलतरोडी, ८) गौरव चिरंजीव बिसेन, वय २८ वर्षे, रा. आंबेडकर नगर, रामजी चौक, वाडी, ९) स्वप्निल बालकदास मुन, वय २९ वर्षे, रा. न्यु हनुमान नगर, शेषनगर जवळ, मानेवाडा, १०) मोहन सुखलाल कोसरे, वय ३३ वर्षे, रा. रामटेके नगर, बेलतरोडी, नागपूर हे ताश पत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले.

आरोपींचे ताब्यातुन रोख ११,१६५/—रू., ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण ११,२१५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. फिर्यादी सरतर्फे पोउपनि. रविकांत भदाने यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. संतोष आंधळे यांनी आरोपींविरूध्द कलम ४,५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरु आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट—१

नागपूर शहरात ''गणपती उत्सव—२०२६'' दि. १४.०९.२०२६ पासून सुरू होत असून, चितार ओळी मध्ये गणपती मुर्ती तयार करण्याचे काम मोठ्या प्रमाणात चालते व तेथून गणपती मुर्ती व ईतर मुर्तींचे सुध्दा फार मोठ्या प्रमाणात विक्री होते. भावसार चौक ते बडकस चौक दरम्यान वाहतुकीसाठी जवळचा रस्ता म्हणून वाहन चालक चितार ओळीचा वापर करतात. त्यामूळे बडकस चौक ते भावसार चौक चितार ओळ मार्गे फार मोठ्या प्रमाणात रहदारी चालते आणि चितार ओळी हा मार्ग अरूंद असल्यामूळे ये—जा कारणाऱ्या वाहनांनी छोटे अपघात घडतात आणि बऱ्याच वेळी वाहतुकीची कोंडी निर्माण होते. त्यामूळे या भागात रहदारीला फार मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होतो. त्या भागातील वाहतूक सुरळीत राहावी व नागरीकांना गैरसोय किंवा अडथळा निर्माण होऊ नये म्हणून, वाहतूक नियमन करण्याचे दृष्टीने नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांच्या हद्दीत नागपूर शहरात वाहतूकीचे नियमनाकरिता अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

**सदर अधिसुचना दिनांक १४.०९.२०२६ चे सकाळी ०६.०० वाजेपासून दि. १५.०९.२०२६ चे सकाळी ०७.०० वाजेपर्यंत अमंलात राहील.**

**अ)** बडकस चौकाकडून चितार ओळी मार्गे भावसार चौकाकडे जाणारी एकेरी वाहतूक सूरू ठेवून भावसार चौक ते चितार ओळी मार्गे बडकस चौक अशी वाहतूक बंद करण्यांत आली आहे. सदरचा मार्ग वरील कालावधीसाठी एक दिशा मार्ग (वन—वे) म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे.

**ब)** भावसार चौकाकडून चितार ओळी मार्गे जाणारी वाहतुक भावसार चौक ते गांधी पुतळा चौक मार्गे बडकस चौकाकडे वळविण्यांत आली आहे.

**क)** बडकस चौक ते शहिद चौक व शहिद चौक ते बडकस चौकाकडे जाणारी वाहतूक गांधीपुतळा चौक येथुन बंद करण्यात येत आहे. तसेच, बडकस चौक कडून येणारी वाहतूक चिटणीस पार्क मार्गे अग्रसेन चोकाकडे व शहिद चौकाकडुन येणारी वाहतूक दारोडकर चौकाकडे वळविण्यात येत आहे.

**ड)** वेळप्रसंगी आवश्यक परिस्थिती नुसार वेळेवर योग्य मार्गाने वाहतूक वळविण्यांचे अधिकार कर्तव्यावरील वाहतुक अमंलदार यांना प्रदान करण्यांत आले आहेत.

नागपूर शहरातील सर्व नागरिकांना विनंती करण्यात येते की, वरील नमुद कालावधीत त्यांनी वरील आदेशाचे पालन करावे.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट—२

वाहतूक परिमंडळ एम.आय.डी.सी. हद्दीत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे कल्पतरू प्रोजेक्टस् इंटरनॅशनल लिमीटेड कडुन लोकमान्य नगर ते हिंगणा गावापर्यंत महाराष्ट्र मेट्रो रेलची उभारणी करणार आहे. सदर

कामा दरम्यान झोन चौक ते आय सी. चौक पर्यत मेट्रो मार्गाचे बांधकाम करण्याकरीता वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**इंडियन ऑयल पेट्रोल पंप ते झोन चौकाकडे जाणारा मुख्य रस्ता बंद करण्यात येत असून वाहतूक खालील प्रमाणे मार्गावर वळविण्यात येत आहे.**

- हिंगणा कडून नागपूर कडे जाणारी वाहतूक हि इंडियन ऑयल पेट्रोल पंप कडुन सर्व्हीस रोडने झोन चौक पर्यत जातील.

**सदरची अधिसूचना दिनांक १४.०९.२०२६ ते दिनांक १३.१०.२०२६ पावेतो अमंलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट—३

वाहतूक परिमंडळ लकडगंज, सक्करदरा नागपूर शहर हद्दीत महाराष्ट्र रेल इनफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (महराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालय यांचा संयुक्त उपक्रम) तर्फे मिरल इन्फ्रा लिमिटेड कंपनी कडुन रेशिमबाग चौक ते के.डी.के कॉलेज आणि टेलीफोन एक्सचेंज चौक ते भांडे प्लॉट चौकपर्यंत उड्डाणपुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. सध्या जगनाडे चौक ते गंगाबाई घाट चौक पर्यंत बिम उभारण्याचे बांधकाम ६० दिवसात करण्यात येणार आहे. त्याकरीता नमुद ठिकाणाहून जड वाहतूक वळविणे आवश्यक आहे. सदरच्या भागात दिवस/रात्र व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**गंगाबाई घाट चौक, वैष्णोदेवी चौक ते जगनाडे चौकाकडे जाणारी जड वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- टेलीफोन एक्सचेंज चाकाकडुन गंगाबाई घाट चौक मार्गे जगनाडे चौकाकडे जाणारी जड वाहतूक ही गंगाबाई घाट चौकातून डावे वळण घेऊन हिवरी नगर चौकातुन उजवे वळण घेऊन के.डी.के कॉलेज मार्गे जातील.
- वैष्णोदेवी चौकाकडुन गंगाबाई घाट चौक मार्गे जगनाडे चौकाकडे जाणारी जड वाहतूक ही हिवरी नगर चौकातून डावे वळण घेऊन के.डी.के कॉलेज मार्गे जातील.

**जगनाडे चौक ते गंगाबाई घाट चौकाकडे जाणारी जड वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- जगनाडे चौकाकडुन गंगाबाई घाट चौकाकडे जाणारी जड वाहतूक ही जगनाडे चौकातून सरळ के.डी.के कॉलेज मार्गे हिवरी नगर चौकातुन पुढे जातील.

**सदर अधिसुचना दिनांक १४.०९.२०२६ रोजी पासून ते दि. १३.१०.२०२६ रोजी पर्यत अंमलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/—**

**(आदित्य मिरखेलकर, भापोसे)**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक,

नागपूर शहर.